जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

दैनिक | वर्ष १ | अंक २४० | गुरुवार, २६ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

## संक्षिप्त

### खरात प्रकरणी अधिकारी अभिजीत भांडे पाटील अडचणीत

**नाशिक, ता. २५ :** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात आता राजकारण्यांच्या नंतर शासकीय अधिकारी अडचणीत आल्याचं दिसून आलं. या प्रकरणात आता मुंबईत उपजिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याची बदली करण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. अभिजीत भांडे पाटील असं त्या अधिकाऱ्याचं नाव आहे. त्यांची प्रतिनियुक्ती संपुष्टात आणून मंत्रालयात बदली करण्यात आलीय. अभिजीत भांडे पाटील हे उपजिल्हाधिकारी पदावर कार्यरत असून त्यांचे अशोक खरातशी असलेले संबंध समोर आलेत. अशोक खरातच्या मुलीच्या आणि पत्नीच्या नावे असलेल्या जमिनीमध्ये गुंतवणूक केल्याप्रकरणी आता त्यांची अडचण वाढण्याची शक्यता वर्तवली जातीय. अशोक खरातशी संबंधित अनेक कामांमध्ये अभिजीत भांडे पाटील यांची गुंतवणूक असल्याचा आरोप केला जातोय. आता त्यांच्यावर करण्यात आलेल्या कारवाईनंतर खरातशी संबंधित इतर महसूल अधिकाऱ्यांचे धाबे दणाणल्याची चर्चा आहे.

# यवतमध्ये महामार्गावरील दिवे चार महिन्यांपासून अंधारात

## प्रशासन आणि महावितरणमध्ये समन्वयाचा अभाव

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. २५ : पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील यवत गावच्या हद्दीत बसवण्यात आलेले सुमारे १६० पथदिवे मागील चार महिन्यांपासून वीज जोडणीअभावी बंद अवस्थेत आहेत. महामार्ग प्रशासनाने खांब उभे करून दिवे बसवले असले, तरी अद्याप प्रकाश पडला नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. रात्रीच्या वेळी रस्ता अंधारात असल्याने प्रवाशांना अपघाताचा धोका पत्करून प्रवास करावा लागत आहे.

यवत हे महामार्गावरील महत्त्वाचे गाव असून, या ठिकाणचा चौपदरी रस्ता होऊन १० वर्षे उलटली आहेत. अनेक वर्षांच्या पाठपुराव्यानंतर महामार्ग प्रशासनाने डिसेंबर महिन्यात यवत गावच्या हद्दीत दोन्ही बाजूला सुमारे ८० पोल उभे केले आणि त्यावर १६० दिवे बसवले. मात्र, चार महिने उलटूनही



हे दिवे केवळ शोभेच्या वस्तू बनले आहेत. रात्रीच्या वेळी गाव आल्याचेही प्रवाशांना समजत नाही, इतका अंधार या परिसरात असतो. रात्रीच्या वेळी रस्ता अंधारात असल्याने समोरून येणारी वाहने किंवा रस्ता ओलांडणारे पादचारी दिसत नाहीत, ज्यामुळे किरकोळ आणि गंभीर अपघातांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

या प्रकल्पाच्या विलंबामागे सरकारी विभागांमधील समन्वयाचा अभाव दिसून येत आहे. महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प अधिकारी रोहन जगताप यांनी सांगितले की, वीज जोडणीसाठी महावितरणशी पत्रव्यवहार केला असून ट्रान्सफॉर्मरसाठी जागाही उपलब्ध करून दिली आहे. मात्र, यवत पाटबंधारे विभागाच्या हद्दीत डीपी (ट्रान्सफॉर्मर) लावण्याचे काम सुरू असताना परवानगी नसल्याचे सांगत हे काम थांबवण्यात आले होते.

**यवत गावाला झळाळी मिळण्याची अपेक्षा**

यवत गावच्या परिसरात सुमारे १ किमी अंतरावर हे हायमास्ट दिवे बसवण्यात आले आहेत. जर या आठवड्यात आश्वासना प्रमाणे वीजपुरवठा सुरू झाला, तर महामार्गावरील अंधार दूर होईलच, पण यवत शहराच्या वैभवातही भर पडणार आहे.

२९ मार्चपर्यंत तरी हे दिवे उजळणार का? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

> राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाच्या वतीने विद्युत जोडणी साठी प्रस्ताव प्राप्त झाला असून यास मंजुरी देखील देण्यात आलेली आहे वीज जोडणीचे काम देखील सुरू करण्यात आले असून या आठवड्यात दि. पूर्वी महामार्गावरील दिवे लावण्यासाठी महावितरण च्या वतीने विद्युत पुरवठा केला जाईल.
> - **नितीन झारगड** (सहाय्यक अभियंता, महावितरण)

> महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण मंडळाच्या वतीने यवत पाटबंधारे विभागाच्या हद्दीत डी.पी लावण्याचे काम होत असल्याने याबाबत परवानगी नसल्याने हे काम थांबविण्यात आले आहे.
> - **स्नेहल शेलार,** शाखा अधिकारी, यवत, पाटबंधारे विभाग

> महामार्ग प्रशासनाच्या वतीने दिवे बसविण्यात आले असून वीज जोडणी बाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांच्याशी पत्रव्यवहार केला आहे. विद्युत ट्रान्सफार्मर (डी.पी )साठी जागा देखील उपलब्ध करुन देण्यात आली असून लवकरच महामार्गावरील दिवे सुरू करण्यात येतील.
> - **रोहन जगताप,** प्रकल्प अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण

## इराण-अमेरिका युद्ध पुन्हा भडकणार?

**नवी दिल्ली, ता. २५ :** डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणविरुद्ध पाच दिवसांच्या शस्त्रसंधीची घोषणा केली. त्यामुळे इराण-अमेरिका संघर्ष थांबणार असल्याचे संकेत मिळत असताना ही चर्चा खुद्द ट्रम्प यांनी फेल ठरवली अन् काही तासातच घुमजाव करत इराणला थेट इशारा दिला.जर दोन्ही देशांमधील चर्चा निष्फळ ठरली, तर इराणवर पुन्हा बॉम्बफेक करू.. इतकचं काय तर इराणमध्ये सत्तांतर होईल, व्हेनेझुएलाप्रमाणे इराणमध्येही एक नेता शोधला जाईल..आम्ही अशा व्यक्तीशी बोलत आहोत, ज्याला मी सर्वात आदरणीय आणि खरा नेता मानतो. ते इराणमधील सर्वोच्च नेते नाहीत. त्यांच्याबद्दल कोणीही काहीही ऐकलेले नाही. अशी धमकी ट्रम्प यांनी इराणला दिलीय.

दुसरीकडे युद्ध थांबवण्यासाठी इराणनं अमेरिकेमुढे ज्या दोन अटी ठेवल्या होत्या त्या अटी ट्रम्प प्रशासनाने फेटाळून लावल्या. पहिली अट होती, अमेरिकेने इराणला युद्धाची नुकसान भरपाई द्यावी. तर दुसरी अट होती, अमेरिकेनेच पहिल्यांदा इराणवर हल्ला केल्याचं कबूल करावं. मात्र या दोन्ही अटी अमेरिकेनं अमान्य केल्यानं इराण युद्ध सुरुच ठेवणार आहे त्यामुळे इराण अमेरिका संघर्ष आता कोणत्या वळणावर पोहचतो आणि ट्रम्प यांचा हाताशी असणारा इराणमधील तो नेता कोण? याकडे संपूर्ण जगाचं लक्ष लागलयं.

# तळेगाव–चाकण महामार्गाला मंजुरी; वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटणार



**पुणे, ता. २५ :** पुणे जिल्ह्यातील तळेगाव आणि चाकण परिसरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून नव्या उन्नत महामार्ग प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे. राज्य सरकारच्या पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्पामुळे औद्योगिक भागातील वाहतूक अधिक सुरळीत होण्याची अपेक्षा आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तळेगाव ते चाकण या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ वर ० ते २६ किलोमीटर अंतरात ४ पदरी उन्नत तसेच ४ पदरी जमिनीवरील महामार्ग तयार केला जाणार आहे. त्यानंतर चाकण ते शिक्रापूर या २६ ते ४३ किलोमीटर अंतरात ४ पदरी जमिनीवरील महामार्ग विकसित करण्यात येणार आहे. हा प्रकल्प डीएफबीओटी पद्धतीने राबविण्यात येणार असून त्यात रचना, निधी, बांधकाम, संचालन आणि हस्तांतरण यांचा समावेश आहे. या प्रकल्पामुळे चाकण औद्योगिक वसाहतीतील वाहतूक कोंडी कमी होण्यास मोठी मदत होईल. दररोज हजारो वाहने या मार्गावरून जात असल्यामुळे सध्या मोठ्या प्रमाणावर अडचणी निर्माण होत आहेत. नवीन महामार्गामुळे प्रवासाचा वेळ कमी होऊन नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

बैठकीदरम्यान प्रकल्पाची कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. या निर्णयामुळे पुणे जिल्ह्यातील दळणवळण अधिक सुलभ होईल आणि औद्योगिक विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# सावळेश्वर टोल नाक्यावर कर्मचाऱ्यांकडून ट्रक चालकाला बेदम मारहाण

## संतप्त चालकांनी टोल फोडला, २ किमीपर्यंत वाहनांच्या रांगा

**सोलापूर, ता. २५ :** सोलापूर जिल्ह्यात टोल वसुलीच्या वादातून पुन्हा एकदा हिंसाचार उसळल्याची घटना समोर आली आहे. सावळेश्वर टोल नाक्यावर टोल देण्याच्या कारणावरून मालट्रक चालक आणि कर्मचाऱ्यांमध्ये झालेली वादावादी थेट मारहाणीपर्यंत पोहोचली. या घटनेत सिद्धू स्वामी (वय ३२, रा. बसवकल्याण) या चालकाला बेदम मारहाण करण्यात आली असून तो गंभीर जखमी झाला आहे. त्याला तातडीने सोलापूरमधील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मंगळवारी दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. सोलापूरहून पुण्याकडे मालट्रक घेऊन निघालेल्या सिद्धू स्वामी यांची ट्रक सावळेश्वर टोल नाक्यावर आली असता, टोल भरण्याच्या मुद्द्यावरून त्यांचा कर्मचाऱ्यांशी वाद झाला. सुरुवातीला झालेली बाचाबाची काही क्षणांतच चिघळली आणि टोल कर्मचाऱ्यांनी चालकावर हल्ला केल्याचा आरोप आहे. या मारहाणीत स्वामी यांना गंभीर दुखापत झाली आणि मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

दरम्यान, घटनेनंतर इतर ट्रक चालक संतप्त झाले. त्यांनी टोल नाक्यावरच तोडफोड करत रास्ता रोको केला. त्यामुळे महामार्गावर दोन्ही बाजूंनी सुमारे २ किलो मीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी राज्य राखीव पोलीस दलाला पाचारण करण्यात आले. पोलीस निरीक्षक बाजीराव पोवार आणि त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतल्यानंतर वाहतूक हळूहळू सुरळीत करण्यात आली. मात्र या घटनेमुळे ट्रक चालकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

# अजित दादांच्या निधनानंतर १८ व्या दिवशीच पक्षावर डल्ला मारण्याचा प्रयत्न?

## रोहित पवारांचा प्रफुल पटेल-तटकरेंवर आरोप

**पुणे, ता. २५ :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षातील अंतर्गत घडामोडींवरून आमदार रोहित पवार यांनी केलेल्या आरोपांनी राज्याच्या राजकारणात नवा वाद निर्माण केला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी पक्षातील काही वरिष्ठ नेत्यांनी सत्तेचे केंद्रीकरण करण्यासाठी घाईघाईत आणि संशयास्पद हालचाली केल्याचा दावा केला.

रोहित पवार यांच्या मते, अजित पवार यांच्या निधनानंतर अवघ्या १८ दिवसांत, म्हणजे १६ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रफुल पटेल, सुनील तटकरे आणि ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनी निवडणूक आयोगाला पत्र देत पक्षाच्या संविधानात बदल झाल्याचे कळवले. या पत्रात राष्ट्रीय अध्यक्ष नसल्यास सर्व अधिकार



कार्याध्यक्षांकडे असतील, अशी तरतूद नमूद करण्यात आली होती. त्या वेळी कार्याध्यक्ष पदावर प्रफुल पटेल होते, त्यामुळे पक्षाचे सर्व निर्णय त्यांच्या हातात जाण्याचा मार्ग मोकळा झाला असता, असा आरोप रोहित पवार यांनी केला.

या प्रक्रियेत सुनेत्रा पवार किंवा पार्थ पवार यांना विश्वासात घेण्यात आले नव्हते, असेही त्यांनी स्पष्ट केले. सुनेत्रा पवार यांना या हालचालीची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून २८ जानेवारी ते स्वतः राष्ट्रीय अध्यक्ष होईपर्यंतचा कोणताही पत्रव्यवहार ग्राह्य धरू नये, अशी विनंती केल्याचे रोहित पवार यांनी सांगितले. यावरून पक्षातील अधिकार हस्तांतरणावरून गंभीर मतभेद असल्याचे स्पष्ट होते.

रोहित पवार यांनी पुढे आरोप करत सांगितले की, पक्षाचा ताबा विशिष्ट गटाकडे ठेवण्याचा आधीपासूनच प्रयत्न सुरू होता. काही नेत्यांनी आणि बाहेरील राजकीय दबावामुळे काही महत्त्वाच्या घडामोडी दडपल्या गेल्याचाही त्यांनी दावा केला. विशेषतः जय पवार यांची नियोजित पत्रकार परिषदही दबावामुळे रद्द झाल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला.

# उरुळी कांचनमध्ये रंगणार भव्य श्रीराम नवमी शोभायात्रा, केरळ नृत्य, नरसिंह अवतार

## जिवंत देखावा ठरणार मुख्य आकर्षण

**उरुळी कांचन, ता. २५ :** उरुळी कांचन पंचक्रोशीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रीराम नवमीनिमित्त भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी (ता. २६) सायंकाळी ६ वाजता ही शोभायात्रा मोठ्या उत्साहात निघणार आहे. यावर्षीच्या यात्रेत प्रथमच सादर होणारा 'नरसिंह अवतार' हा जिवंत देखावा भाविकांसाठी मुख्य आकर्षण ठरणार आहे.




यंदाची शोभायात्रा अधिक देखणी आणि भव्य करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. उरुळी कांचनमध्ये प्रथमच 'नरसिंह अवतार' जिवंत देखावा सादर केला जाणार आहे. शोभायात्रेमध्ये खास आकर्षण म्हणून 'केरळ नृत्य' सादर केले जाईल. तसेच आकर्षक सजावट आणि डोळे दिपवणारी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. मिरवणुकीत 'राजदत्त साऊंड अँड लाईट' आपली सेवा देणार असून फटाक्यांची भव्य आतिशबाजीही केली जाणार आहे. तसेच भक्तांना श्रीराम पादुकांचे दर्शन घेण्याची विशेष संधी मिळणार आहे.

दरम्यान, सदर पालखी आणि मिरवणूक उरुळी कांचन हद्दीतील डॉ. मणिभाई देसाई पतसंस्था ते एम.जी. रोड मार्गे आश्रम रोडपर्यंत जाणार आहे. श्रीरामांच्या पादुकांचे दर्शन आणि मिरवणुकीचा आनंद घेण्यासाठी पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उरुळी कांचन पंचक्रोशी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# हवेलीमध्ये सातबारा दुरुस्तीच्या नावाखाली सावळा गोंधळ

## चार तहसीलदारांसह अनेक अधिकारी गोत्यात, फौजदारी कारवाईची शक्यता

**संदीप बोडके**

थेऊर, ता. २५ : पुणे जिल्ह्यात तब्बल ३८ हजार ७/१२ मध्ये दुरुस्तीच्या नावाखाली वेगळेच कारनामे केल्याने पुणे विभागातील १५२ अधिकारी महसूलमंत्र्याच्या रडारवर आले आहेत. या भ्रष्टाचाराच्या बजबजपुरीत सन २०२० ते २०२५ मधील हवेलीचे चार तत्कालीन तहसीलदार अडकल्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांतच हवेली महसूलमधील सर्वांत मोठा घोटाळा उघडकीस येण्याची शक्यता आहे.

### फौजदारी कारवाई होणार

तहसीलदारांच्या चुक दुरुस्तीच्या आदेशात अहवाल सादर करणारे हवेली तालुक्यातील तलाठी व मंडल अधिकारी तसेच कार्यालयीन टिपणी सादर करणारे क्लार्क, अव्वल कारकून, महसूल नायब तहसीलदार यांचीही कारवाईच्या भितीने धाकधूक वाढली आहे. तसेच ज्या प्रकरणांच्या फाईल्स गायब आहेत, त्यांच्यावर सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ नुसार फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचे महसूल विभागाकडून सांगण्यात आले आहे.

१५२ अधिकाऱ्यांपैकी १५ अधिका-यांवर अतिगंभीर, ८२ गंभीर व ५५ अधिका-यांवर अनियमिततेचा ठपका ठेवण्यात आला आहे. अनियमितता व चुकीच्या कार्यपद्धतीमुळे हवेलीतील तहसीलदारांवर फौजदारी कारवाई, निलंबन, बदली व विभागीय चौकशीची टांगती तलवार कायम असल्याने अधिका-यांच्या पोटात गोळा आला आहे.

हवेली तालुक्यातील अनेक ७/१२ वर चुक दुरुस्तीचे कलम १५५ च्या नावाखाली तहसील कार्यालयाने अनेक ठिकाणी मालकी हक्क बदलले आहेत. तसेच जमिनीचे क्षेत्रफळ कमी जास्त करणे. नवीन शर्तीचे शेरे बदलणे, नोटीस न बजावता आदेश पारित करणे, ईतर हक्कांतील नावे कमी करणे, सरकारी आकारी पड कमी करणे, प्रोटोकॉलच्या लालसेपोटी पदाचा दुरुपयोग करत प्रांताधिकारी यांचे अधिकार वापरून फेरफार दुरुस्तीचे आदेश पारित करणे. प्राप्त अधिकाराच्या बाहेर जाऊन केलेली बेकायदेशीर कामे संबंधित अधिकाऱ्यांना चांगलीच भोवली आहे. अनियमितता हवेलीतील अधिका ७/१२ मध्ये बदल करणे.

पेटी व खोके च्या प्रोटोकॉलद्वारे क्रिम पोस्ट मिळवण्यात माहीर असलेल्या या नामांकित हवेलीतील तहसीलदारांनी कारवाईच्या बडग्यातून सॉफ्ट कॉर्नर घेण्यासाठी मंत्रालयातील लॉबीकडे प्रयत्न सुरू ठेवले आहेत. मात्र ७/१२ च्या शुद्धलेखनाच्या दुरुस्तीवरुन मोठा घोटाळा झाल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेत मान्य केले होते. तसेच यामधील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईचा इशारा दिला आहे. त्यामुळे दोषी असलेल्या तहसीलदारांवर कारवाई होणार का ? अथवा त्यांना अभय मिळणार ? याकडे हवेलीकरांचे लक्ष लागले आहे.

## संक्षिप्त

### राज्यातील अनधिकृत बांधकामे नियमित

**पुणे, ता. २५ :** मुंबई वगळून राज्यभरातील शासकीय जमिनींवरील १ जानेवारी २०११ पर्यंतची सर्व अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंगळवारी घेण्यात आला. यानुसार एका कुटुंबातील एकच अतिक्रमण, अनधिकृत बांधकाम नियमित करण्यात येणार आहे. १५०० चौरस फुटांपर्यंतचे क्षेत्र नियमानुकूल करण्यात येणार असून त्यातील ५०० चौरस फुटांचे अतिक्रमण मोफत नियमित केले जाईल. राज्यात यापूर्वी ४ एप्रिल २००२ मध्ये १ जानेवारी १९९५ पूर्वीची शासकीय जमिनीवर झालेली निवासी वा वाणिज्य अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. आता राज्यातील गरीब आणि गरजू कुटुंबांच्या निवासस्थानाचा प्रश्न निकाली काढण्यासाठी मुंबई वगळून संपूर्ण राज्यातील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमित करण्यासाठी महसूल विभागाने नवीन धोरण तयार केले असून त्याला मान्यता देण्यात आली.

# जेजुरीतील दुकानदाराला मारहाण प्रकरणी ५ जणांना बेड्या

**जेजुरी, ता. २५ :** जेजुरी गडाच्या पायथ्याशी असलेल्या नंदी चौकात भंडारा-खोबरे विक्रेत्याला मारहाण करून दुकानाची तोडफोड करणाऱ्या पाच आरोपींना जेजुरी पोलिसांनी अटक केली आहे. चपला ठेवण्यासारख्या किरकोळ कारणावरून झालेल्या या वादात दुकानदाराला बेदम मारहाण करण्यात आली होती. हि घटना ३१ जानेवारीला घडली होती.

याप्रकरणी पोलिसांनी स्वप्नील जयेंद्र कांबळे (वय-३३ , रा. दिघी, पुणे), प्रणय राजू पाटोळे वय-२६, यश राजू पाटोळे (वय-१९, रा. दोघेही काळेवाडी, सुधीर बाळू पाटोळे (वय -३४ व सूरज बाळू पाटोळे (वय-२५, रा. दोघेही मरकळ) यांना अटक केली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जेजुरी येथील नंदी चौकात महादेव वाघमारे यांचे भंडारा, खोबरे आणि पेढे विक्रीचे दुकान आहे. ३१ जानेवारी रोजी काही भाविक या दुकानासमोर आले आणि त्यांनी तिथे चपला ठेवण्याचा हट्ट धरला. वाघमारे यांनी, ज्या दुकानातून साहित्य घेतले तिथे चपला ठेवा, आमच्या दुकानासमोर ठेवू नका, असे सांगितले. या साध्या कारणावरून वाद विकोपाला गेला आणि आरोपींनी जमाव जमवून वाघमारे यांना लाकडी दांडक्याने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. इतकेच नव्हे तर दुकानातील साहित्य फेकून देऊन मोठी मोडतोड केली आणि आरोपी पसार झाले.

या घटनेनंतर महादेव वाघमारे यांनी १ फेब्रुवारी रोजी जेजुरी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तींविरुद्ध तक्रार दिली होती. दरम्यान, या मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला. या व्हिडिओचा आधार घेत पोलिसांनी दोन आरोपींचे फोटो व्हॉट्सप ग्रुपवर प्रसारित केले होते. गोपनीय बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी या पाचही आरोपींना शोधून काढले आणि त्यांच्या मुसक्या आवळल्या.

दरम्यान, सदर कारवाई जेजुरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहायक पोलीस फौजदार नंदकुमार पिंगळे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

### अमेरिकेकडून इराणसाठी १५ कलमी शांतता प्रस्ताव

**नवी दिल्ली, ता. २५ :** इराणसोबतच्या सध्याच्या संघर्षामुळे निर्माण झालेल्या गंभीर पेचप्रसंगातून मार्ग काढण्यासाठी अमेरिकेने इराणकडे एक व्यापक १५ -कलमी योजना पाठवली आहे. द न्यूयॉर्क टाइम्सच्या वृत्तानुसार, हा प्रस्ताव पाकिस्तानच्या माध्यमातून इराणपर्यंत पोहोचवण्यात आला असून, पाकिस्तानने मध्यस्थी करण्याची तयारी दर्शवली आहे. इस्त्रायलच्या चॅनेल १२ ने दिलेल्या वृत्तानुसार, या योजनेत एक महिन्याची युद्धबंदी घोषित करून त्यादरम्यान वाटाघाटी करण्याची तरतूद आहे. या कालावधीत इराणच्या अणुकार्यक्रमावर कडक निर्बंध, स्ट्रट ऑफ होर्मुझमधील वाहतुकीची मुक्तता आणि प्रॉक्सी गटांना पाठिंबा थांबवणे यासारख्या प्रमुख मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. इस्त्रायलकडून या प्रस्तावाबाबत साशंकता व्यक्त करण्यात आली असून, इराण या कठोर अटी मान्य करेल की नाही याबाबत शंका व्यक्त केली जात आहे.



### अहिल्यानगरमध्ये २ कोटींचा बेकायदेशीर गॅस रिफिलिंग साठा जप्त

**अहिल्यानगर, ता. २५ :** अहिल्यानगर येथील स्थानिक गुन्हे शाखेने बेकायदेशीर गॅस रिफिलिंग करणाऱ्या एका मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. कामरगाव परिसरात करण्यात आलेल्या या कारवाईत पोलिसांनी तब्बल २.१ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, या प्रकरणी चार आरोपींना रंगेहाथ अटक केली आहे.

व्यावसायिक गॅस टँकरमधून अनधिकृतपणे गॅस काढून तो छोट्या टाक्यांमध्ये भरला जात असल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने कामरगाव परिसरातील संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी गॅस रिफिलिंगचा कारखाना सुरू असतानाच पोलिसांनी आरोपींना पकडले. या कारवाईत पोलिसांनी तीन मोठे गॅस टँकर आणि रिफिलिंगसाठी वापरले जाणारे तांत्रिक साहित्य असा एकूण २ कोटी १ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तपासात असे समोर आले आहे की, परिसरात गॅसचा पुरवठा कमी असल्याचा फायदा घेऊन आरोपींनी हा बेकायदेशीर व्यवसाय सुरू केला होता. कोणतीही सुरक्षा मानके न पाळता केल्या जाणाऱ्या अशा रिफिलिंगमुळे भीषण आग लागणे किंवा स्फोट होऊन मोठी जीवितहानी होण्याचा धोका असतो. केवळ नफ्यासाठी नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्या या टोळीचा पोलिसांनी वेळीच बंदोबस्त केला आहे. दरम्यान, अटक करण्यात आलेल्या चार आरोपींकडे पोलीस कसून चौकशी करत आहेत. हे रॅकेट किती काळापासून सुरू होते, यामध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, आणि हा बेकायदेशीर गॅस स्थानिक बाजारपेठेत कुठे विकला जात होता, याचा तपास स्थानिक गुन्हे शाखा करत आहे.

# शाळांमध्ये पिंक रूम अन् शहरात १०० मोफत स्वच्छतागृह; पुणे महानगरपालिकेचा निर्णय

**पुणे, ता. २५ :** पुण्यात महिलांच्या सुरक्षितता, सक्षमीकरण आणि आर्थिक स्वावलंबनाला चालना देण्यासाठी पुणे महानगरपालिकेकडून व्यापक उपक्रमांची घोषणा करण्यात आली आहे. वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर महिलांच्या सुरक्षिततेचे प्रश्न आणि रोजगाराच्या संधींची गरज लक्षात घेऊन हे निर्णय घेण्यात आले आहेत. या उपक्रमांमुळे महिलांना केवळ संरक्षणच नव्हे, तर आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करण्याची संधी मिळणार आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे स्वसंरक्षण प्रशिक्षण केंद्रांची उभारणी. या केंद्रांमध्ये ज्युडो, कराटे, लाठी-काठी, योग आणि व्यायामाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामुळे महिलांना आपत्कालीन



परिस्थितीत स्वतःचे रक्षण करण्याची क्षमता मिळेल. विशेषतः शहरात वाढणाऱ्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम महत्त्वाचा मानला जात आहे.

आर्थिक सक्षमीकरणासाठी महिला बचत गटांना कौशल्य विकास प्रशिक्षण आणि कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी मार्गदर्शन, आर्थिक सहाय्य आणि विक्रीची संधी मिळणार असल्याने त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याची अपेक्षा आहे. त्याचबरोबर विविध शासकीय योजनांद्वारे व्यवसाय प्रशिक्षण, विद्यार्थिनींसाठी शैक्षणिक मदत, तसेच विधवा आणि निराधार महिलांसाठी आर्थिक आधार देण्याचेही नियोजन आहे. महिलांच्या मालकी हक्काला प्रोत्साहन देण्यासाठी ३१ मार्च २०२६ पर्यंत ५०० चौ.फुटांपर्यंतच्या मालमत्तेवर ५०% करमाफी देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे महिलांच्या नावावर मालमत्ता घेण्याची प्रवृत्ती वाढेल आणि त्यांचे आर्थिक स्थान मजबूत होईल. याशिवाय महिला उद्योजक आणि बचत गटांसाठी स्वतंत्र कन्व्हेन्शन सेंटर उभारण्याची योजना आहे, जिथे प्रशिक्षण, प्रदर्शन आणि व्यावसायिक नेटवर्किंगच्या संधी मिळतील. शाळांमध्ये किशोरवयीन मुलींसाठी पिंक रूम तयार करून त्यांच्या आरोग्य, मानसिकता आणि शिक्षणाबाबत मार्गदर्शन केले जाईल. तसेच शहरभरात १०० मोफत आणि सुरक्षित स्वच्छतागृह उभारण्याचा निर्णय घेतला आहे. एकूणच, पुणे महानगरपालिकेचे हे उपक्रम केवळ योजना नसून, महिलांना सुरक्षित, सक्षम आणि आत्मनिर्भर बनवण्याच्या दिशेने उचललेले ठोस पाऊल मानले जात आहे.

### नरेंद्र मोदी १०० टक्के ट्रम्पच्या कंट्रोललमध्ये : राहुल गांधी

**नवी दिल्ली, ता. २५ :** पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभेत अमेरिकेच्या विरोधात एकही शब्द बोलले नाहीत, अशी टीका काँग्रेसचे नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी केली आहे. मोदी १०० टक्के ट्रम्प यांच्या कंट्रोलमध्ये असल्याचा दावाही त्यांनी केला. पंतप्रधान मोदींनी संसदेत २५ मिनिटं भाषण केलं.

अमेरिकेविरोधात चकार शब्दही काढले नाहीत. शतप्रतिशत ते ट्रम्पच्या कंट्रोलमध्ये आहेत, असं राहुल गांधी म्हणाले. राहुल गांधींनी मोदींच्या नेतृत्वातील केंद्र सरकारवर निशाणा साधला. भारत सरकारने पहिल्यांदा अमेरिकी उत्पादनांसाठी कृषी क्षेत्र खुलं केलं, असा आरोपही त्यांनी केला. ट्रेड डीलवरून राहुल गांधींनी पंतप्रधान मोदींवर थेट निशाणा साधला. मोदींनी व्यापार करार करून



भारताचं कृषी क्षेत्र अमेरिकेसाठी खुलं केलं. आपल्याकडे लहान शेत आहेत. तर अमेरिकेत मोठमोठे शेत असतात.

आपल्याकडे शेतकरी बऱ्याचदा हाताने काम करतात. तिकडे मोठमोठ्या मशीन असतात. जर अमेरिकेचा माल भारतात यायला लागला तर, आपले शेतकरी उद्ध्वस्त होतील. त्यामुळे कोणत्याच पंतप्रधानांनी अमेरिकेसाठी कृषी क्षेत्र खुलं केलं नव्हतं, असं राहुल गांधी म्हणाले.

# संतोष देशमुख प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळेची माहिती देणाऱ्याला मोठं बक्षीस जाहीर

**बीड,ता. २५ :** बीडजिल्ह्यातील मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाला तब्बल १४ महिने उलटूनही मुख्य संशयित आरोपी अजूनही फरार असल्याने तपास यंत्रणांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. मात्र आता राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने आक्रमक भूमिका घेत फरार आरोपी कृष्णा आंधळेचा शोध लावण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे.

संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येने राज्यभर खळबळ उडाली होती. या प्रकरणातील अनेक आरोपींना अटक झाली असली तरी, प्रमुख सूत्रधारांपैकी एक मानला जाणारा कृष्णा आंधळे गेल्या १४ महिन्यांपासून पोलिसांना चकवा देत आहे. या दिरंगाईवर न्यायालयानेही तीव्र नाराजी व्यक्त करत सीआयडीला



जाब विचारल्यानंतर तपासाला नवे गतीमान मिळाले आहे.

या पार्श्वभूमीवर सीआयडीने कृष्णा आंधळेबाबत खात्रीशीर माहिती देणाऱ्यास १ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. विशेष म्हणजे, माहिती देणाऱ्याची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे भीती न बाळगता नागरिकांनी पुढे येऊन माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

तपास यंत्रणांनी आता पारंपरिक पद्धतींसोबत तांत्रिक तपास अधिक तीव्र केला आहे. मोबाईल ट्रॅकिंग, आर्थिक व्यवहार आणि संपर्क साखळी तपासण्यासोबतच खबऱ्यांचे जाळेही अधिक मजबूत करण्यात आले आहे. फरार आरोपीच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले जात असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. दरम्यान, मस्साजोग ग्रामपंचायतीच्या निवडणुका तोंडावर आल्याने या प्रकरणाला राजकीय पार्श्वभूमीही लाभली आहे. २८एप्रिल रोजी मतदान आणि २९ एप्रिलला निकाल जाहीर होणार असल्याने, या आधी आरोपीला अटक होणे महत्त्वाचे मानले जात आहे. संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी कृष्णा आंधळेची अटक निर्णायक ठरणार आहे. आता सीआयडीने जाहीर केलेल्या बक्षिसानंतर नागरिकांकडून माहिती मिळते का आणि फरार आरोपी कधी पोलिसांच्या जाळ्यात अडकतो, याकडे संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# दादांच्या दोन्ही घरांबाहेर काळी जादू झाली तर अनेक नेत्यांनी करंगळी कापली : रोहित पवार

**पुणे, ता. २५ :** अजित पवार यांच्या कथित मृत्यू प्रकरणाभोवतीचे वाद अधिकच तीव्र होत असून, आमदार रोहित पवार यांनी अत्यंत गंभीर आणि खळबळजनक आरोप केले आहेत. त्यांनी थेट ब्लॅकमॅजिक आणि राजकीय कटकारस्थानाचा मुद्दा उपस्थित करत या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

रोहित पवार यांनी दावा केला की, अजित पवार जिवंत असताना त्यांच्या घराबाहेर काळी जादू केल्याचे प्रकार घडले होते. मुंबईतील त्यांच्या निवासस्थानाबाहेरही असेच प्रकार झाल्याचा आरोप त्यांनी केला. एवढेच नव्हे, तर त्यांच्या पक्षातील काही नेत्यांची करंगळी कापण्यात आल्याचेही त्यांनी म्हटले. दादांची ताकद कमी व्हावी आणि ती इतरांना मिळावी, या हेतूने हे सगळं केलं गेलं




का, याची चौकशी झाली पाहिजे, असे ते म्हणाले. या संदर्भात त्यांनी अशोक खरात प्रकरणाकडेही लक्ष वेधत अंधश्रद्धा आणि राजकारण यांचा संबंध तपासण्याची गरज व्यक्त केली.

याचबरोबर त्यांनी मोठा गौप्यस्फोट करत काही महत्त्वाची कागदपत्रे आपल्या हाती लागल्याचा दावा केला. दादांच्या पक्षातील काही कागदं आमच्याकडे आहेत. येत्या काळात आम्ही अनेक गौप्यस्फोट करू, असे सांगत त्यांनी राजकीय घडामोडींना वेगळे वळण दिले. भाजप अजित पवारांचा पक्ष कमकुवत झाल्याचे गृहीत धरून आमदारांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. तसेच सध्याचे लक्ष दुसरीकडे वळवून राजकीय समीकरणे बदलण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सूचित केले. दरम्यान, अजित पवार यांच्या मृत्यू प्रकरणी कर्नाटकमध्ये नोंदवलेल्या झिरो एफआयआरचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. महाराष्ट्रात गुन्हा नोंदवला गेला नाही, पण कर्नाटक पोलिसांनी पुढाकार घेतल्याबद्दल त्यांनी आभार मानले. आता हा तपास महाराष्ट्रात कसा होतो, यावर आम्ही लक्ष ठेवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, हा तपास पूर्णपणे निष्पक्ष आणि पारदर्शक झाला पाहिजे. या प्रकरणामागे कितीही मोठी शक्ती असली तरी दोषींना शिक्षा झालीच पाहिजे, असा इशारा देत रोहित पवार यांनी शेवटपर्यंत लढण्याची भूमिका स्पष्ट केली. या सर्व आरोपांमुळे प्रकरणाला राजकीय, सामाजिक आणि तपासाच्या पातळीवर नवे वळण मिळाले असून, पुढील घडामोडीकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

### मांजरी–केशवनगरमध्ये गुन्हेगारी रोखण्यासाठी स्वतंत्र पोलीस चौकीची मागणी

#### ५ एकर जमीन अतिक्रमणमुक्त करून लोककल्याणकारी प्रकल्प उभारावा

**पुणे, ता. २५ :** पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १५ मधील मांजरी केशवनगर आणि साडेसतरानळी परिसरात नागरिकांच्या मूलभूत सुविधांबाबत मोठी मागणी पुढे आली आहे. वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे आणि नागरीकरणा मुळे या भागात आरोग्य, शिक्षण, सुरक्षा आणि मालकी हक्काशी संबंधित प्रश्न तीव्र झाले असून, स्थानिकांनी प्रशासनाकडे ठोस उपाययोजनांची मागणी केली आहे.



साडेसतरानळी ग्रामपंचायत कार्यालयाजवळील सुमारे ५ एकर एरिकेशन विभागाची जागा सध्या मोकळी असून, ती अतिक्रमणाच्या धोक्यात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. ही जागा वेळेत ताब्यात घेऊन त्यावर जनकल्याणकारी प्रकल्प उभारावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रस्तावित प्रकल्पांमध्ये अत्याधुनिक सरकारी रुग्णालय, ई-लर्निंग इंग्लिश माध्यम शाळा, क्रीडा संकुल, प्रशासनिक भवन, विठ्ठल-रुक्माई मंदिर आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र यांचा समावेश आहे. या सुविधा उभारल्यास परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. दरम्यान, परिसरात वाढत असलेल्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा हा देखील मोठा मुद्दा बनला आहे. कोयता गँगसारख्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी स्वतंत्र पोलीस चौकी उभारण्याची मागणी जोर धरत आहे. या भागातील

जमीन मालकीचा प्रश्नही तितकाच गंभीर आहे. सर्वे नंबर २०६ गोसावी येथील रहिवासी गेल्या २०० ते ३०० वर्षांपासून येथे वास्तव्यास असून, त्यांनी नियमितपणे करही भरले आहेत. तरीही त्यांच्या घरांची अधिकृत नोंद सातबारा उताऱ्यावर नाही. त्यामुळे गायरान जमीन गावठाण म्हणून घोषित करून प्रत्येक घरधारकाला मालमत्ता हक्क देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच दांगट वस्तीतील रहिवाशांचेही नाव प्रॉपर्टी कार्डावर नोंदवण्याची मागणी आहे.

# अवैध वाहतुकीविरोधात हलगी नादात आंदोलन; लहूजी शक्ती सेनेचा पोलीस आयुक्त कार्यालयावर धडक मोर्चा

**पुणे, ता. २४ :** हडपसर-उरुळी कांचन मार्गावरील वाढत्या अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात कारवाई न झाल्याच्या निषेधार्थ लहूजी शक्ती सेनेच्या कार्यकर्त्यांनी पुणे पोलीस आयुक्त कार्यालया समोर हलगी-नाद आणि बोंबाबोंब आंदोलन करत आज मंगळवारी (ता.२४) प्रशासनाचे लक्ष वेधले. या आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. संघटनेच्या वतीने पोलीस आयुक्तांना दिलेल्या निवेदनात, अवैध प्रवासी वाहतुकीला खतपाणी घालणाऱ्या आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्या संबंधित वाहतूक अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करून त्यांना बडतर्फ करण्याची मागणी करण्यात आली आहे.




लहूजी शक्ती सेनेचे पदाधिकारी विजय सकट यांनी दिलेल्या माहितीनुसार, २९ मे २०२५ रोजी उरुळी कांचन परिसरात रिक्षा चालकांकडून प्रवाशांशी गैरवर्तन तसेच एका रिक्षामध्ये ९ ते १० प्रवाशांना कोंबून अवैध प्रवासी वाहतूक केल्याची तक्रार करण्यात आली होती. याबाबत १५ जुलै २०२५ रोजी पोलीस आयुक्त कार्यालयात लेखी अर्जही सादर करण्यात आला होता.

तक्रारीनंतरही ठोस कारवाई झाली की नाही, याची माहिती घेण्यासाठी माहिती अधिकार कायद्यान्वये मागविलेल्या माहितीत २९ मे ते ५ जून

#### शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी

संघटनेने पोलीस आयुक्तांकडे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करून त्यांना सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी केली आहे. तसेच अवैध वाहतुकीवर तात्काळ नियंत्रण आणावे, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

२०२५ या कालावधीत हडपसर ते उरुळी कांचन मार्गावर कोणतीही दंडात्मक कारवाई झाल्याचा अभिलेख उपलब्ध नसल्याचे स्पष्ट करण्यात आले, असा दावा संघटनेने केला आहे.

या प्रकरणात हडपसर वाहतूक विभागाचे तत्कालीन पोलीस निरीक्षक धनंजय पिंगळे आणि लोणी काळभोर वाहतूक विभागाचे तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक देवेंद्र पवार यांनी कर्तव्यात कसूर केल्याचा आरोप करण्यात आला आहे. चौकशी अहवालातही संबंधित अधिकाऱ्यांची बाजू मांडून त्यांना पाठीशी घातल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. दरम्यान, या घटनेचे व्हिडिओ पुरावे, सोशल मीडियावरील बातम्या आणि वारंवार दिलेली निवेदने असूनही गेल्या नऊ महिन्यांत कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, अशी खंत व्यक्त करत लहूजी शक्ती सेनेने अखेर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा निर्णय घेतल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# खरातच्या फार्म हाऊसवर नरबळीचा संशय

## पिस्तुलाच्या रिकाम्या पुंगळ्या, काडतुसं अन् राजमुद्रा असलेलं रिव्हॉल्व्हर जप्त

**नाशिक, ता. २५ :** नाशिकमधील स्वयंघोषित ज्योतिषी कॅप्टन अशोक खरात प्रकरणात न्यायालयीन सुनावणीदरम्यान अत्यंत धक्कादायक बाबी समोर आल्या असून, तपास अधिकच गंभीर वळण घेत आहे. महिलांवरील लैंगिक अत्याचाराच्या आरोपांमध्ये अटकेत असलेल्या खरातला पोलीस कोठडी संपल्यानंतर पुन्हा नाशिक सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. तपास अपूर्ण असल्याचे सांगत पोलिसांनी कोठडी वाढवण्याची मागणी केली आणि न्यायालयाने ती मान्य करत २९ मार्चपर्यंत ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

या सुनावणीत सरकारी पक्षाने केलेले दावे चिंताजनक होते. तपासादरम्यान खरातच्या ताब्यातून रोख रक्कम, लॅपटॉप, रिव्हॉल्वर आणि काडतुसे जप्त करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. विशेष म्हणजे या रिव्हॉल्वरमधील ५ काडतुसे फायर झाल्याचे समोर आले असून, त्याचा वापर नेमका कुठे आणि कशासाठी झाला याचा तपास सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर नरबळी दिल्याचा संशयही व्यक्त करण्यात आला असून, या शक्यतेमुळे प्रकरणाची व्याप्ती अधिकच गंभीर बनली आहे.

तपास यंत्रणांनी न्यायालयात असेही सांगितले की, खरात स्वतःला सिद्ध पुरुष म्हणून सादर करून लोकांना जाळ्यात ओढत असे. महिलांना विधीच्या नावाखाली केबिनमध्ये एकटे नेऊन, त्यांच्या कुटुंबीयांना बाहेर बसवले जात असे आणि त्यानंतर अत्याचार केल्याचा आरोप आहे. काही प्रकरणांमध्ये पेढे किंवा पाण्यात काही द्रव्य मिसळून महिलांना गुंगी आणली जात असल्याचाही संशय व्यक्त करण्यात आला आहे.

आतापर्यंत या प्रकरणात एकूण ६ गुन्हे दाखल झाले असून ५ महिलांनी आणि १ पुरुषाने तक्रार दिली आहे. प्रत्येक तक्रारीत साधारण एकाच पद्धतीने फसवणूक आणि शोषण केल्याचा पॅटर्न समोर येत आहे. बचाव पक्षाने तपासासाठी पुरेसा वेळ मिळाल्याचे सांगत आणखी कोठडीची गरज नसल्याचा युक्तिवाद केला. मात्र न्यायालयाने तपासातील गंभीर मुद्दे लक्षात घेऊन पोलिसांना अधिक वेळ देणे आवश्यक असल्याचे नमूद केले.

दरम्यान, याप्रकरणाने अंधश्रद्धा, लैंगिक शोषण आणि संभाव्य गंभीर गुन्ह्यांचा धोकादायक संगम उघड केला आहे. विशेषतः नरबळीच्या संशयामुळे या तपासाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले असून, पुढील चौकशीतून आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# भाजपने संकल्पपत्रातील शब्द फिरवला; पाचशे चौरस फुटांच्या मिळकत करात सवलत नाहीच

**पुणे, ता. २५ :** महापालिका निवडणुकीत दिलेल्या गाजावाजा केलेल्या आश्वासनांची आठवण सत्ताधारी भाजपला सत्तेत आल्यानंतर राहिलेली नसल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. ५०० चौरस फुटांपर्यंतच्या घरांना मिळकत करमाफी देण्याचा शब्द देणाऱ्या भाजपने आता महिलांच्या नावावरील घरांनाच ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेत, शब्द फिरवला आहे. त्यामुळे भाजपने पुन्हा पुणेकरांना आश्वासन देऊन गाजर दाखवल्याची चर्चा आहे.

स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी मंगळवारी २०२६-२७ या वर्षीचे अंदाजपत्रक सर्वसाधारण सभेत सादर केले. महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी १३




हजार ९९५ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक सादर केले होते. भिमाले यांनी यामध्ये हजार ६७४ कोटींची भर घालत १५ हजार ६६९ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक आज सादर केले. अंदाजपत्रक सादर करताना भिमाले यांनी महिलांच्या नावावर असलेल्या ५०० चौ. फुटांपर्यंच्या घरांना मिळकत करात ५० टक्क्यांपर्यंत सवलत जाहीर केली.

३१ मार्च २०२६ पर्यंत महिलांच्या नावावर असलेल्या निवासी मिळकतींना ५० टक्के करमाफी देण्याचा निर्णय जाहीर केला असला, तरी मूळ आश्वासनाला हरताळ फासल्याची भावना नागरिकांत आहे. निवडणुकीपूर्वी सर्वच पक्षांनी ५०० स्क्वेअर फुटपर्यंतच्या घरांना करमाफी देण्याची घोषणा केली होती. मात्र सत्ता मिळाल्यानंतर आर्थिक कारणांचा दाखला देत सत्ताधाऱ्यांनी माघार घेतली. महापालिकेच्या प्रशासनानेही या प्रस्तावावर नकारात्मक भूमिका घेतली होती. सरसकट करमाफी दिल्यास सुमारे पावणे तीनशे कोटी रुपयांचे उत्पन्न बुडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. यामुळे सत्ताधारी भाजप अडचणीत सापडला आणि अखेर महिलांच्या नावावरच्या घरांना अंशतः सवलत देण्याचा पर्याय पुढे आणण्यात आला.

### काँग्रेसने मांडला होता मिळकत कर माफीचा प्रस्ताव

स्थायी समितीच्या पहिल्याच बैठकीत काँग्रेसने ५०० फुटांपर्यंतच्या घरांचा मिळकत कर माफ करण्याचा ठराव मांडला होता. या ठरावाला कोणत्याही पक्षाने विरोध केला नव्हता. मात्र निर्णय घेण्याऐवजी भाजप सदस्यांनी प्रशासनाकडून अभिप्राय मागवत हा विषय पुढे ढकलला. त्यामुळे करमाफीचा निर्णय रखडला. आता महिलांच्या नावावरील घरांना ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय जाहीर करताना भाजपने राजकीय तोल साधण्याचा प्रयत्न केला असला, तरी मूळ आश्वासनापासून झालेली माघार लपवता येणार नाही, अशी टीका होत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षांवर पाणी फिरल्याची भावना तीव्र आहे. आता या निर्णयावर विरोधक काय भूमिका घेतात याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे.

# चंदननगर भागात अल्पवयीन युवतींवर अत्याचार; दोन तरुणांना अटक

**पुणे, ता. २५ :** चंदननगर परिसरात अल्पवयीन युवतींना धमकावून त्यांच्या बलात्कार करण्यात आल्याच्या दोन घटना घडल्या. या प्रकरणात पोलिसांनी दोन तरुणांना अटक केली आहे. याबाबत एका अल्पवयीन युवतीच्या आईने चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपी बालाजी गुरुनाथ स्वामी (वय-२७, रा. लक्ष्मीनगर, येरवडा) याला अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, युवती अल्पवयीन असल्याची माहिती स्वामीला होती. त्याने मुलीला जाळ्यात ओढले. युवतीवर त्याने वेळोवेळी बलात्कार केला. हा प्रकार उघडकीस



आल्यानंतर युवतीच्या आईने त्याला जाब विचारला. तेव्हा आरोपी स्वामी पीडित युवतीच्या घरात शिरला. त्याने तिची आई आणि वडिलांना जिवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहायक पोलीस निरीक्षक विकास बाबर तपास करत आहेत.

अशा प्रकारची आणखी एक घटना चंदननगर भागात घडली आहे. अल्पवयीन युवतीवर बलात्कार करुन तिची छायाचित्रे समाज माध्यमात प्रसारित करण्याची धमकी देणाऱ्या तरुणाला पोलिसांनी अटक केली. ऋतिक रावसाहेब लोणके (वय-२७, रा. सोमनाथननगर, वडगाव शेरी) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत पीडित अल्पवयीन युवतीने चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित युवतीला लोणके याने विवाहाचे आमिष दाखविले. विवाहाच्या आमिषाने त्याने तिच्यावर बलात्कार केला. ही बाब युवतीच्या मावशीला समजली. मावशीने लोणके याला जाब विचारला. तेव्हा मला तिच्याबरोबर बोलू दिले नाही, तर समाज माध्यमात युवतीची छायाचित्रे प्रसारित करेल, अशी धमकी दिली. लोणके याच्याविरुद्ध पोलिसांकडे तक्रार देण्यात आल्यनंतर त्याला अटक करण्यात आली.

चंदननगर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या दोन्ही गुन्ह्यांमध्ये आरोपींविरुद्ध बलात्कार, तसेच बालकांचे लैंगिक संरक्षण अधिनयमान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, वाघोली आणि हडपसर पोलीस ठाण्याात दोन अल्पवयीन युवतींना फुस लावून पळवून नेण्यात आल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत.

# धनुष्यबाण चुकीच्या हातात गेल्यावर काय होत; आदित्य ठाकरे यांचा टोला

**मुंबई, ता. २५ :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते, युवासेनाप्रमुख, आमदार आदित्य ठाकरे यांनी विधानसभेत बोलताना वन्यजीव व मुंबई महानगरपालिकेने प्रकाशित केलेला संजय गांधी राष्ट्रीय उद्यान याचा मास्टर प्लॅन याबाबत एक सवाल केला आहे. यावेळी ठाण्यात बाण लागल्यामुळे जखमी झालेल्या माकडाचा आदित्य ठाकरे यांनी संदर्भ दिला. तसेच धनुष्यबाण चुकीच्या हातात गेल्यावर त्याचा राज्यावर काय परिणाम होतो ते आता कळायला लागले आहे, असा सणसणीत टोला देखील लगावला आहे.

काल दोन बातम्या महत्त्वाच्या आपल्या पेपरमध्ये आलेल्या आहेत. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान याचा मास्टर प्लॅन मुंबई महानगरपालिकेने प्रकाशित



केलेला आहे आणि त्याचबरोबर ही एक दुसरी बातमी म्हणजे एका वानराची. या एका माकडाच्या गळ्यात स्टीलचा बाण मारला गेलेला आहे. वन्य भागांमधली लोकवस्ती जे आदिवासी बांधव राहत होते, ते आणि बाकीचे जे वन्यजीव आहेत, ते एकमेकांच्या को-ऑपरेशनमध्ये राहत होते, को-एक्झिस्ट करत होते. पण आता धोक्याची घंटा ही आहे की, कालच जो एक मास्टर प्लॅन आलेला आहे, तो ना आमदारांना माहिती आहे, ना स्थानिक लोकप्रतिनिधींना माहिती आहे.

मुंबई महानगरपालिकेने तो प्रकाशित केला आणि दुसऱ्या बाजूला असं जर वन्यजीव धोक्यात आलं, तर याच्यावर कडक कारवाई करण्याची जबाबदारी ही नेमकी कोणाची असेल? हे वनखात्याने सांगावे. कारण काल एका माकडाला मारलंय, आज एका माकडाची माहिती येतेय. आपण जर चित्र पाहिलं, त्याचा चेहरा पाहिला, तर त्याला भयानक त्रास होत आहे.बरोबर मानेतून तो बाण गेलेला आहे. दुर्दैव असं आहे की, आपल्या देशात अनेकदा आपण पाहतो की वानरांना पाहिलं की लगेच नमस्कार करतो. अयोध्येसारख्या ठिकाणी असेल किंवा इतर स्थानी, एक वेगळी श्रद्धा आहे या वानरांबद्दल. पण या ठिकाणी एका त्या माकडाला जो बाण लागलाय त्याबाबत धनुर्विद्या शिकवतो त्याच्यावर संशय घेतलेला आहे. पण दुर्दैवाने असं आता व्हायला लागलेलं आहे की, धनुष्यबाण चुकीच्या हातात गेल्यानंतर त्याचा कसा वापर होऊ शकतो आणि आपल्या देशावर, आपल्या राज्यावर त्याचा काय परिणाम होऊ शकतो ते कळायला लागलेले आहे, असे ते म्हणाले. पुढे ते म्हणाले की, मी शासनाला याची तातडीने दखल घेण्याची आणि याच्यावर कारवाई करण्याची विनंती करतो. जसं आपण सांगतो की कुठलंही वन्यजीव दुसऱ्यावर आलं, माणसांवर आलं तर शूट ट साईट ऑर्डर देतो, तर यामध्ये (बाण मारणाऱ्यावर) शूट ट साईट ऑर्डर देणार का? असा सवाल देखील त्यांनी यावेळी केला.






Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## उन्हाळ्यात गाजर खाणे किंवा त्याचा ज्यूस पिणे आरोग्यास किती लाभदायक ठरते

गाजर अलिकडे बारही महिने आपल्याला बाजारात दिसतात. गाजर हे आपल्या शरीरासाठी फार महत्त्वाचे मानले जाते. गाजराचा ज्यूस पिण्याचे फायदे अगणित आहेत. खासकरून उन्हाळ्याच्या दिवसात आपण हा रस पिल्याने शरीराला खूप फायदे मिळतात.

गाजराचा रस शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करतो, ज्यामुळे यकृत निरोगी राहते.

गाजराच्या रसामध्ये व्हिटॅमिन ए मुबलक प्रमाणात असते. व्हिटॅमिन ए डोळ्यांसाठी खूप आवश्यक मानले जाते. यामुळे दृष्टी सुधारण्यास खूप मदत होते.

गाजराच्या रसात कॅल्शियम आणि व्हिटॅमिन केअसते, जे हाडे मजबूत करण्यासाठी आवश्यक आहेत.

गाजरामध्ये व्हिटॅमिन ए आणि अँटिऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात असतात. त्यामुळे त्वचा निरोगी राहण्यास मदत होते. तसेच गाजराचा ज्यूस पिण्यामुळे त्वचेवरील डाग कमी होतात. तसेच त्वचेला चमकही येते.

गाजराच्या रसात पोटॅशियमची मात्रा खूप असते. पोटॅशियम आपल्या ह्द्यासाठी खूप उत्तम मानले जाते. यामुळे रक्तदाब देखील नियंत्रणात राहतो. तसेच हृदयविकाराचा धोकाही खूप कमी होतो.

वजन कमी करणाऱ्यांसाठी गाजराचा ज्यूस हा खूप महत्त्वाचा मानला जातो. गाजराच्या रसात कॅलरीज कमी असतात. यामुळेच वजन कमी करण्यास मदत होते.

# उद्धव ठाकरेंमध्ये राजकारणापेक्षा संवेदनशीलता अधिक : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई, ता. २४ :** माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या व्यक्तिमत्त्वात राजकारणापेक्षा संवेदनशीलता अधिक ठळकपणे जाणवते. त्यांचा स्वभाव मुळात पारंपरिक राजकारणी स्वरूपाचा नसला, तरी एकदा निर्णय घेतला की तो ठामपणे अंमलात आणण्याची त्यांची शैली ही शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या गुणांची आठवण करून देणारी असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत म्हटले.

विधान परिषदेतून निवृत्त होत असलेल्या उद्धव ठाकरे, डॉ. नीलम गोऱ्हे, अमोल मिटकरी, शशिकांत शिंदे, राजेश राठोड, संदीप जोशी, दादाराव केचे, रणजितसिंह मोहिते-पाटील आणि संजय केनेकर या सदस्यांना निरोप देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राजकारणात मतभेद, भूमिका आणि संघर्ष असले तरी त्या पलीकडे सहप्रवासाचे एक वेगळे नाते असते. उद्धव ठाकरे यांच्यासोबतचा प्रवास अनेक वर्षांचा असून, या काळात समाज आणि राज्याच्या हितासाठी अनेक चांगल्या गोष्टी एकत्रितपणे करण्याची संधी मिळाली. महाराष्ट्रातील गडकिल्ले, निसर्ग आणि वारकरी परंपरेतील क्षण त्यांनी अत्यंत प्रभावीपणे आपल्या कॅमेऱ्यात टिपले आहेत. महाराष्ट्र देशा आणि पाहावा विठ्ठल ही त्यांची कामे केवळ छायाचित्रणापुरती मर्यादित नसून राज्याच्या सांस्कृतिक वारशाची जपणूक करणारी असल्याचे त्यांनी सांगितले.




उद्धव ठाकरे यांच्या भाषणशैलीची मांडणी सहज, संवादात्मक आणि विनोदी कोट्यांनी परिपूर्ण असते. जरी ते आक्रमक शैलीत बोलताना दिसत असले तरी त्यांचा मूळ स्वभाव शांत, संयमी आणि संबंध जपणारा असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विधानपरिषदेच्या उपसभापती तथा ज्येष्ठ नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे या महिलांच्या प्रश्नांवर सातत्याने झटणाऱ्या, अभ्यासू, संवेदनशील आणि प्रभावी सामाजिक कार्यकर्त्या म्हणून ओळखल्या जातात. केवळ आमदार म्हणून नव्हे तर एक सामाजिक कार्यकर्त्या म्हणून त्यांनी अधिक प्रभावीपणे काम केले आहे. महिलांवर अन्याय, अत्याचार किंवा एखादी सामाजिक घटना घडली की, त्या तात्काळ घटनास्थळी पोहोचून परिस्थितीचा आढावा घेतात आणि संबंधितांचा आवाज शासनापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करतात.

अमोल मिटकरी यांच्याबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मिटकरी यांना विविध विषयांवर, विशेषतः शेती क्षेत्रांमध्ये चांगले ज्ञान आहे. या सर्व विषयांमध्ये ते सातत्याने सक्रिय राहून काम करत आहेत. शशिकांत शिंदे यांनी कामगार चळवळ सक्षमपणे पुढे नेण्यासाठी उल्लेखनीय योगदान दिले आहे. बदलत्या अर्थव्यवस्थेच्या गरजा ओळखून कामगारांच्या हितासाठी त्यांनी सातत्याने भूमिका मांडली असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले.


संजय केनेकर यांचा सार्वजनिक जीवनातील प्रवास प्रेरणादायी आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतून त्यांनी आपल्या कार्याची सुरुवात केली. सार्वजनिक जीवनातील त्यांची सातत्यपूर्ण वाटचाल अनेकांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. दादाराव केचे यांनी सातत्याने लोकसेवेचे काम केले आहे. कामांचा पाठपुरावा करण्याची त्यांची शैली विशेष उल्लेखनीय मानली जाते. त्यांच्या नेतृत्वाखाली वर्धा जिल्ह्यात अनेक विकासकामांना गती मिळाली.

रणजितसिंह मोहिते पाटील हे महाराष्ट्रातील उदयोन्मुख युवा नेतृत्व म्हणून पुढे आले आहेत. सहकार, शेती, शिक्षण आणि उद्योग क्षेत्रात त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला आहे. क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांचा सहभागही उल्लेखनीय असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी सर्व निवृत्त सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# ऑनलाइन पेमेंटसाठी एक एप्रिलपासून होणार अधिक विलंब

**नवी दिल्ली, ता. २५ :** १ एप्रिल २०२६ पासून, डिजिटल पेमेंट प्रक्रिया मोठ्या प्रमाणात बदलणार आहे. ऑनलाइन पेमेंटला आता थोडा जास्त वेळ लागेल. यामध्ये एकाऐवजी दोन टप्पे असतील, पण तुमचे पेमेंट अधिक सुरक्षित होईल. मोठ्या रकमेच्या व्यवहारांवर अतिरिक्त तपासणी केली जाईल. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे, या म ार्गदर्शक तत्त्वांचे पालन न केल्यामुळे कोणतेही आर्थिक नुकसान झाल्यास, बँकेला ग्राहकाला पूर्ण भरपाई देणे बंधनकारक असेल.

भारतीय रिझर्व्ह बँकेचे (RBI) डिजिटल पेमेंट संदर्भातील नवीन नियम एप्रिल २०२६ पासून लागू होतील. पेमेंट करताना टू-फॅक्टर



ऑथेंटिकेशन (2FA) आवश्यक असेल. यापुढे, वापरकर्त्यांना पासवर्ड, पासफ्रेज, पिन, हार्डवेअर टोकन किंवा कार्ड, सॉफ्टवेअर-आधारित ऑथेंटिकेशन टोकन, फिंगरप्रिंट किंवा बायोमेट्रिक्स जसे की फिंगरप्रिंट किंवा चेहऱ्याची ओळख (फेशियल रेकग्निशन) वापरणे देखील आवश्यक असेल. सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास, SMS द्वारे मिळालेल्या OTP सोबत, तुम्हाला तुमच्या मोबाईल पासवर्डने किंवा इतर कोणत्याही पद्धतीने व्यवहाराची पडताळणी करावी लागेल.

आतापर्यंत, व्यवहारांसाठी फक्त SMS द्वारे मिळालेला जढ्ढ टाकणे पुरेसे होते. पण आता, सुरक्षेचा एक अतिरिक्त स्तर जोडला जाईल. यामुळे मोबाईल चोरी किंवा सिम स्वॅपसारख्या फसवणुकीला आळा बसेल. जर व्यवहार मोठ्या रकमेचा असेल, तर बँक अतिरिक्त सुरक्षा प्रदान करेल. याचा अर्थ असा की, व्यवहारा दरम्यान पेमेंट तुम्हीच केले आहे का, हे विचारण्यासाठी सिस्टम तुम्हाला कॉल करू शकते.

आरबीआयने म्हटले आहे की, जोखीम व्यवस्थापनाच्या उद्देशाने, वित्तीय संस्था मूल्यांकनासाठी व्यवहार ओळखू शकतात. हे व्यवहाराचे ठिकाण, वापरकर्त्याचे वर्तन, डिव्हाइस तपशील आणि व्यवहाराचा इतिहास यांसारख्या घटकांच्या आधारावर केले जाऊ शकते. याचा अर्थ असा की, तुमच्या व्यवहार पद्धतीनुसार सुरक्षा उपायांचा एक मानक संच निश्चित केला जाईल.

या नवीन प्रणालीमुळे ग्राहकांना महत्त्वपूर्ण फायदे मिळण्याची अपेक्षा आहे. रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे की, जर या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न केल्यामुळेग्राहकाला आर्थिकनुकसान झाले, तर जारीकर्ता, म्हणजेच बँक किंवा संस्था, ग्राहकाला पूर्ण भरपाई देण्यास बांधील असेल.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मध्यरात्री वर्षा बंगल्यावर

**मुंबई, ता. २५ :** सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीवेळी पोलिसांकडून शिंदे गट आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांना झालेल्या धक्काबुक्कीवरुन विधिमंडळातील वातावरण प्रचंड तापले होते. शिंदे सेनेच्या आमदारांनी साताऱ्याचे पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांच्यासह १०० पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी केली होती. त्यावर विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी तुषारी दोशी यांच्या निलंबनाचे निर्देश दिले होते. या सगळ्या घडामोडींनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मध्यरात्री मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी दाखल झाले होते. यावेळी एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात चर्चा झाली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी साताऱ्यात शिवसेनेकडून खेळण्यात आलेली



राजकीय खेळी आणि शंभुराज देसाई यांच्या आरोपांबाबत नाराजी बोलून दाखवली. तसेच सांगली जिल्हा परिषद निवडणूक प्रकरणावरूनही मुख्यमंत्र्यांनी असहमती व्यक्त केल्याचं म्हटलं जातंय. मोठा भाऊ म्हणून भाजपची भूमिका सामंजस्याची आहे. पण साताऱ्यासारखे प्रकार खपवून घेणार नाही, असं एकनाथ शिंदे यांनी यावेळी फडणवीसांना स्पष्टपणे सांगितले. त्यामुळे आता दोन्ही पक्षातील वाद निवळणार की त्याला वेगळं वळण लागणार, हे पाहावं लागणार आहे.



## पुण्यात दीड कोटींच्या खंडणीसाठी व्यापाऱ्याचे अपहरण

पुणे, ता. २५ : दीड कोटीच्या खंडणीसाठी गुलटेकडी परिसरातून एका व्यापाऱ्याचे अपहरण करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी स्वारगेट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एका व्यापाऱ्याच्या पत्नीने स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार व्यापारी गुलटेकडीतील महर्षीनगर भागात राहायला आहे. मार्च रोजी सकाळी नेहमीप्रमाणे तक्रारदार महिलेचे पती दुकानात गेले. दुपारी ते घरी जेवण करण्यासाठी यायचे. मात्र, दुपारी जेवण करण्यासाठी पती घरी आले नाहीत. त्यानंतर दुपारी एकच्या सुमारास समाज माध्यमातील संपर्क सुविधेचा वापर करुन आरोपींनी महिलेच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला.

अनोळखी मोबाइल क्रमांकावरुन महिलेच्या पतीने संपर्क साधला. माझे अपहरण करण्यात आले आहे. माझ्या जिवाला धोका आहे. मला डांबून ठेवले आहे, असे व्यापाऱ्याने पत्नीला सांगितले. अपहरण करणाऱ्या आरोपींनी पत्नीकडे दीड कोटी रुपयांची खंडणी मागितली. खंडणी दिल्यानंतर पतीची सुटका करतो, अशी धमकी दिली. या घटनेनंतर घाबरलेल्या पत्नीने स्वारगेट पोलीस ठाण्यात धाव घेऊन पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक यशवंत निकम तपास करत आहेत.

# डझनभर मंत्री आणि दोन डझन अधिकारी जेलमध्ये जातील : हर्षवर्धन सपकाळ

**नाशिक, ता. २५ :** भोंदूबाबा अशोक खरातच्या इशानेश्वर मंदिराला देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने २०१८ साली १.५ कोटी रुपयांचा निधी दिला होता. फडणवीसांच्या कार्यालयात त्यावेळी कार्यरत असणारे व आता म्हाडाचे अधिकारी मिलिंद बोरीकर यांचेही या बाबाशी अत्यंत जवळकीचे संबंध आहेत, अशी माहिती मिळत आहे. अशोक खरात प्रकरणात सरकारने प्रामाणिकपणे कारवाई केली तर डझनभर मंत्री आणि दोन डझन अधिकारी जेलमध्ये जातील, असे म हाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ द वर केलेल्या पोस्ट मध्ये म्हणतात की, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचेही या भोंदू सोबतचे



फोटो समोर आले आहेत. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचेही या भोंदू खरातशी अत्यंत जवळचे संबंध होते, त्यांनीही मुख्यमंत्री होण्यासाठी या बाबाकडून अघोरी पुजा केल्याची माहिती मिळत आहे.

भोंदूबाबाचे कारनामे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना सहा महिन्यांपासून माहित होते. पण त्यांच्या आजूबाजूचे लोक, मंत्रीमंडळातील सहकारी यांचे अशोक खरातशी संबंध असल्यानेच माहिती मिळूनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही कारवाई केली नव्हती, पण त्यांच्या मित्रपक्षातील सहका-यांनी देवेंद्र फडणवीस यांचे मुख्यमंत्रीपद घालवण्यासाठी खरातकडून तंत्र मंत्र व अघोरी पूजा केल्यानेच फडणवीसांनी भोंदूबाबा अशोक खरात विरोधात कारवाई केली. दरम्यान, भोंदू बाबा अशोक खरातच्या निमित्ताने देवेंद्र फडणवीस आता मित्रपक्ष आणि स्वतःच्या पक्षातील हितशत्रूंना ब्लॅकमेल करत आहेत, असेही हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

# मनोज जरांगेंचा धनगर समाजाला पाठिंबा

**मुंबई, ता. २५ :** मुंबईतील आझाद मैदानावर सुरू असलेल्या धनगर आरक्षण आंदोलनाला आता वेगळीच धार मिळताना दिसत आहे. एसटी प्रवर्गातून आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणावर बसलेल्या आंदोलक दीपक बोऱ्हाडे यांच्या समर्थनार्थ मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी प्रत्यक्ष भेट देत धनगर समाजाला थेट संघर्षासाठी तयार राहण्याचे आवाहन केले.

आंदोलनाचा नववा दिवस सुरू असताना जरांगे पाटील यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, घरी बसून आरक्षण मिळणार नाही. मिळेल त्या साधनाने मुंबईत या, रस्त्यावर उतरा. तुम्ही ताकदीने लढलात तर सहा कोटी मराठा समाज तुमच्या मागे उभा करतो. त्यांच्या या विधानामुळे आंदोलनाला नवे राजकीय आणि सामाजिक वजन मिळाल्याचे मानले जात आहे.

धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित



आहे. एसटी प्रवर्गात समावेश व्हावा, ही मुख्य मागणी असून, त्यासाठी वेळोवेळी आंदोलनं झाली आहेत. मात्र ठोस निर्णय न झाल्याने समाजात नाराजी वाढत चालली आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबईतील उपोषणाला आता व्यापक स्वरूप येण्याची चिन्हे आहेत.

जरांगे पाटील यांनी धनगर समाजातील नेत्यांनाही स्पष्ट संदेश दिला. मान-अपमान बाजूला ठेवून समाजासाठी एकत्र या. नेतृत्वाच्या वादात वेळ घालवू नका, समाजाच्या हक्कासाठी लढा, असे त्यांनी आवाहन केले. तसेच समाजानेही आपल्या नेत्यांचा सन्मान राखत एकजूट दाखवावी, असेही ते म्हणाले. विशेष म्हणजे, मराठा आणि धनगर या दोन मोठ्या समाजांमध्ये आंदोलनाच्या पातळीवर निर्माण होणारी एकजूट ही राजकीय समीकरणांसाठीही महत्त्वाची मानली जात आहे. जरांगे पाटील यांनी मी नेता नाही, मी आंदोलक आहे, असे म्हणत नेतृत्व धनगर समाजानेच घ्यावे, असे स्पष्ट केले. दरम्यान, या भेटीनंतर आझाद मैदानावरील आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आता सरकार या वाढत्या दबावाला कसे प्रतिसाद देते आणि धनगर आरक्षणाबाबत कोणता निर्णय घेतला जातो, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## लग्नाच्या आमिषाने लुटणारी टोळी जेरबंद तीन तरुणींना अटक

**अहिल्यानगर, ता. २५ :** लग्नाच्या नावाखाली विश्वास संपादन करून लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा कोपरगाव तालुका पोलिसांनी पर्दाफाश केला असून, या कारवाईत तीन तरुणींना अटक करण्यात आली आहे, तर दोन मुख्य आरोपी अद्याप फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

कोपरगाव तालुक्यातील रवंदा येथील फिर्यादीस २१ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर २०२५ दरम्यान लग्नाचे आमिष दाखवून आरोपींनी संगनम ताने दोन लाख २९ हजार रुपयांची रोख रक्कम, तसेच सोने-चांदीचे दागिने लुटल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे.

याप्रकरणी कशीष सुकदेव भालेराव, भ्रमता सुकदेव भालेराव, भूमी किरण निकम (सर्व रा. नाशिक) या तीन तरुणींना अटक करण्यात आली आहे. तर अशोक तान्हाजी काळे व बनिता अशोक काळे (रा. आंगणगाव, ता. येवला) हे दोघे




अद्याप फरार आहेत. तसेच गोकुळ चिदा पानकर याचाही गुह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. या संदर्भात कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान पोलिसांनी आडगाव नाका (नाशिक) परिसरात सापळा रचून आरोपींना शिताफीने ताब्यात घेतले. न्यायालयाने आरोपींना पोलीस कोठडी दिली आहे. चौकशीदरम्यान आरोपींनी गुह्याची कबुली देत खोटे लग्न लावून फसवणूक केल्याचे मान्य केले. त्यांच्या ताब्यातून रोख रक्कम व दागिने जप्त करण्यात आले आहेत.

# श्रीमंतांना झोप लागत नाही आणि प्रामाणिक कष्ट करणाऱ्यांना झोप आवरता येत नाही

**मुंबई कधीही न झोपणारं शहर. दिवसा जशी धावपळ, तशीच रात्रीही दिव्यांची लखलख आणि गाड्यांची गर्दी. या गजबजाटात दादरच्या एका रस्त्यावर टिपलेला एक साधा फोटो मात्र मनाला अस्वस्थ करून गेला. त्या एका क्षणात समाजातील दोन टोकांची जाणीव इतकी ठळकपणे समोर आली की मनात नकळत एक म्हण घुम ली. श्रीमंतांना झोप लागत नाही आणि प्रामाणिक कष्ट करणाऱ्यांना झोप आवरता येत नाही.**

रस्त्याच्या कडेला, दुचाकीवरच एक मजूर शांतपणे झोपलेला होता. डोक्याखाली उशी नव्हती, अंगावर महागडी चादर नव्हती, आजूबाजूला वातानुकूलित हवा नव्हती; तरीही त्याच्या चेहऱ्यावर विलक्षण समाधान आणि गाढ झोप होती. त्या शांत चेहऱ्याकडे पाहताना जाणवलं कष्टाची भाकरी खाणाऱ्याला झोपेसाठी गोळी लागत नाही; त्याला दिवसभराच्या श्रमांचीच झोप पुरेशी असते.

दुसरीकडे, त्याच वेळी दादरम धील उंच इमारतींच्या खिडक्यांतून अजूनही दिवे लुकलुकत होते. वातानुकूलित खोल्या, मऊ गाद्या, महागड्या उशा पण त्या उशांवर डोके टेकवूनही अनेकांना झोप येत नसते. हेच जीवनाचं परस्परविरोधी चित्र .एकीकडे साधेपणात समाधान, तर दुसरीकडे ऐश्वर्यात अस्वस्थता. मराठी भाषेत एक सुंदर म्हण आहे. जशी करणी तशी भरणी. दिवसभर प्रामाणिकपणे घाम गाळणारा माणूस रात्री शांतपणे झोपतो, कारण त्याच्या मनात अपराधीपणा नसतो आणि अपूर्णतेची भीतीही नसते. पण संपत्तीच्या मागे धावताना अनेकदा



माणूस स्वतःलाच हरवतो आणि मग झोप त्याच्यापासून दूर पळते.

दादरचा तो फोटो म्हणजे जणू समाजाचा आरसाच आहे. तो आरसा आपल्याला विचारायला भाग पाडतो. खरी श्रीमंती नेमकी कुठे आहे? पैशात की मनःशांतीत? फुटपाथवर उभी असलेल्या दुचाकीवरच झोपलेला तो मजूर जरी गरीब असला, तरी त्याच्या चेहऱ्यावरची झोप ही राजासारखी होती. हे दृश्य पाहताना संत तुकारामांच्या ओळी आठवल्या शिवाय राहत नाहीत. जोडी नाही समाधानाला, धनसंपत्तीला काय मोल?

हा फोटो केवळ एका रात्रीचा नाही; तो अनेक अनामिक कष्टकऱ्यांच्या आयुष्याचा प्रतिनिधी आहे. दिवसाढवळ्या बांधकामे करणारे, गाड्या ढकलणारे, माल उचलणारे, चहा विकणारे, हे सगळे लोक शहर उभं ठेवतात; पण रात्री त्यांच्यासाठी उरतो तो फुटपाथच. तरीही त्यांच्याकडे एक गोष्ट असते निखळ, निर्व्याज आणि गाढ झोप.

श्रीमंतीच्या चमकदार प्रकाशात अनेकदा मनाची शांतता हरवते. पैसा, प्रतिष्ठा, स्पर्धा आणि जबाबदाऱ्या, या सगळ्यांच्या ओझ्याखाली श्रीमंत माणूस कधी कधी स्वतःच्या उशावरही अस्वस्थ होतो. म्हणूनच एक जुनी म्हण सांगते. पैसा सगळं विकत घेऊ शकतो, पण समाधान विकत घेऊ शकत नाही. दादरच्या त्या रात्रीत टिपलेला हा क्षण जणू एक जिवंत कविता आहे. एकीकडे उंच इमारतींच्या खिडक्यांत जागरण, आणि दुसरीकडे फुटपाथवर शांत झोपलेलं श्रमाचं आयुष्य.

हा फोटो पाहताना मनात एकच विचार ठाण मांडून बसतो. ज्याच्या मनात चिंता नाही, त्यालाच खऱ्या अर्थाने झोपेची संपत्ती लाभते. शेवटी, हा फोटो केवळ छायाचित्र नाही; तो समाजातील विषमता, श्रमाचे मूल्य आणि मनःशांतीचा खरा अर्थ यांचा जिवंत दस्तऐवज आहे. तो आपल्याला शिकवतो. उशी मऊ असली तरी मन कठीण असेल तर झोप येत नाही; पण चटई कठीण असली तरी मन शांत असेल तर झोप गाढ लागते.

शब्दांकन : **विशाल कदम**
(छायाचित्रकार : **प्रशांत बोराडे,** उरुळी कांचन, ता. हवेली)